*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

***मराठी विभाग आयोजित***

## मराठी वाङ्मय मंडळ आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रम अहवाल

## दि. ८ मार्च २०१६

---

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी उच्चशिक्षण घेताना वैचारिक स्पष्टता आणि कणखर मानसिकतेच्या साहाय्याने समाजात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करावी असे आवाहन प्राचार्य डॉ एस. बी. पाटील यांनी केले ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी डॉ. तानाजी गिते, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे , प्रा दिलीप मुळूक , प्रा वर्षा कांबळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ पाटील म्हणाले की , पुरुष व स्त्रीयांवरील जबाबदाऱ्यांचा तुलनात्मक विचार केला तर स्त्री मुक्त झालेली नसून उलट तिची जबाबदारी अधिक वाढली आहे. सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने प्रभावीपणे काम करीत असून स्त्रीयांनी आपल्या बुद्धीला, आत्मसन्मानाला नवीन दिशा दिली आहे. तरीही स्त्रीयांच्या समस्या कमी झाल्या नसून सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार त्यांच्या प्रश्नाचे स्वरूप बदलत गेले आहे. जगात हेलन केलर सारख्या अनेक स्त्रीयांनी आपल्या व्यंगावर मात करताना स्वकर्तुत्वाने आपला स्वतंत्र ठसा उमटविला असून त्यांचा आदर्श समोर ठेऊन विद्यार्थिनींनी स्वत:चा भविष्यकाळ उज्ज्वल करायला हवा, असे ते म्हणाले

या दिवसाच्या निमित्ताने स्त्रियांवर होणारे अत्याचार , बालिकेपासून मोठ्या मुलींना कसे सांभाळायचे, त्यांची सुरक्षितता, अन्यायावर तोडगा, विवाहानंतरचे समुपदेशन, घटस्फोटापासून संसार वाचविणे, घराघरातील स्त्रियांमधील संवाद वाढविणे, सोशल मिडीयाचा होणारा परिणाम अशा अनेक विषयावर प्रबोधनात्मक चर्चा होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ तानाजी गिते यांनी आपल्या मनोगतात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांनी आपल्या अधिकारांबाबत केलेल्या संघर्षातून दिलेल्या लढ्याला ऐतिहासिक महत्त्व असल्याचे सांगून महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने आजचा दिवस महत्वाचा असल्याचे सांगितले. महिला दिनाच्या निमिताने महिला सबलीकरण या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आदिशक्तीच्या रूपातील स्त्रीयांचा आदर करण्याची, त्यांना समतेची वागणूक देण्याची आणि स्त्रीभ्रूणहत्या करणार नसल्याची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि शपथेचे वाचन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी केले तर आभार प्रा. दिलीप मुळूक यांनी मानले.

डॉ बी. डी.अनुसे
मराठी विभाग प्रमुख



जगतिक महिला दिनानिमित्त समता शपथेचे वाचन करताना
डॉ. संजय शिंदे



शपथ ग्रहण करताना
प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, डॉ.टी.जी.गिते, प्रा.दिलीप मुळूक